## प्रेसनोट

दिनांक १३/०४/२०२२

**“ सामाजिक सुरक्षा विभाग यांचे पथकाने गोमांस ची वाहतुक करणाऱ्या तसेच मुरुम या गौणखनिजाचे उत्खनन करुन विक्री करीता चोरी करणाऱ्या इसमांवर कारवाई केलेबाबत ”**

दिनांक १२/०४/२०२२ रोजी मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत गोपनिय माहिती मिळाली की, एक आयशर कंपनीचा टेम्पो क्रमांक एमएच ०३ सिव्ही ९१६३ हिचेमध्ये बैल, वासरु तसेच गायींचे कत्तल केलेल्या मासांची साठवणुक करुन त्याची बेकायदेशीर विक्रीसाठी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश यांनी मिळालेल्या गोपनिय माहितीची खात्री करुन कार्यवाही करणे बाबत सामाजिक सुरक्षा विभागाचे प्रमुख पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण यांना मार्गदर्शन करुन योग्य त्या सुचना दिल्या होत्या.

सामाजिक सुरक्षा विभागाचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण यांनी त्यांचे अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांची टिम तयार करुन गोमांसाची वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांवर **दिनांक १२/०४/२०२२ रोजी रात्री २२:१५ वाजता** चे सुमारास **रावेत पोलीस चौकीच्या हद्दीत किवळे ता. मुळशी जि. पुणे येथील बेंगलोर-मुंबई हायवे रोड लगत असलेल्या गणेश वडेवाले यांचे समोरील सर्व्हिस रोडवर** नाकाबंदी लावुन सापळा रचुन **एक आयशर कंपनीचा टेंम्पो क्रमांक एमएच ०३ सिव्ही ९१६३** यामध्ये बैल, वासरु तसेच गायींचे कत्तल केलेल्या मासांची साठवणुक करुन त्याची बेकायदेशीर विक्रीसाठी वाहतुक करणाऱ्या इसमांवर छापा टाकला असता आरोपीच्या ताब्यात मिळुन आलेल्या मुद्देमालाचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

१) १०,००,०००/- रु किं चा एमएच ०३ सिव्ही ९१६३ क्रमांकाचा आयशर कंपनीचा टेंम्पो.
२) ३,००,००० /-रु किं.चे अंदाजे १५०० किलो वजनाचे गाय व बैलांचे कत्तल केलेले मांस प्रत्येकी २०० रु किलो प्रमाणे.

---------------------------------

**असा एकुण १३,००,०००/- रु किं चा मुद्देमाल** मिळुन आला म्हणुन इसम नामे **१) नागनाथ चणप्पा नागेशी** वय ३८ वर्षे रा. रमाईनगर झोपडपट्टी, रावेत पुणे मुळपत्ता मु.पो.वळसंग ता. दक्षिण सोलापुर जि. सोलापुर **पाहिजे आरोपी २) मेहबुब अब्दुल कुरेशी** वय ४० वर्षे रा कसाई गल्ली, फलटण चौक, बारामती जि. पुणे. **पाहिजे आरोपी ३) साजीद फरीद कुरेशी** यांचे विरुध्द रावेत पोलीस चौकी येथे **गुरनं २२१/२०२२ महाराष्ट्र प्रांणी रक्षण (सुधारणा) अधिनियम कलम ५,५ (सी) ९ ९ (अे) ९ (बी) ११ सह भा.दं.वि.कलम ४२९,३४ मो.वा.का.कलम ६६(१)/१९२** प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन **आरोपी क्र.१ याला सदर गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे.** पुढील तपास रावेत पोलीस चौकी करीत आहे.

तसेच मा. सहायक पोलीस आयुक्त श्री. डॉ. प्रशांत अमृतकर यांना त्याचे गुप्त बातमीदामार्फत गोपनिय माहिती मिळाली की, **महाळुंगे (ईं) पोलीस चौकीच्या** हद्दीत **मु.पो.खालुंब्रे ता.खेड जि.पुणे येथे TOP BAND कंपनीच्या शेजारी मोकळ्या जागेत** इसम नामे स्वप्नील शिवेकर हा स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी जेसीबीच्या सहाय्याने जमीनीवर उत्खनन करुन मुरुमाची चोरी करुन त्याची विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, अप्पर पोलीस आयुक्त श्री. डॉ. संजय शिंदे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे श्री. डॉ. काकासाहेब डोळे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. डॉ. प्रशांत अमृतकर, मा सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. पद्माकर घनवट यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाचे प्रमुख

पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण यांनी त्यांचे अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांची टिम तयार करुन दोन-तीन दिवसापासुन ट्रॅप लावला असता माहिती मिळाली की, रात्री दरम्यान अवैधरित्या जमीनीवर उत्खनन करुन विक्री करीता जेसीबीच्या सहाय्याने मुरुमाची चोरी केली जात आहे. अशा मिळालेल्या माहितीवरुन दिनांक १३/०४/२०२२ रोजी सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी **महाळुंगे (ई) पोलीस चौकीच्या** हद्दीत **रात्रौ ०२:१०** वा. चे सुमारास सापळा रचुन छापा टाकला असता तीन इसम मरुम चोरी करताना मिळुन आले त्यांचे ताब्यात मिळुन आलेल्या मुद्देमालाचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**१)** १६,५२,०००/- रु किं चा एक निळया पांढ-या रंगाचा **टाटा कंपनीचा एमएच ४६ एआर ४८७६ क्रमांकाचा दहाचाकी हायवा.** त्यामध्ये अंदाजे ०२ ब्रास मुरुम किंमत अंदाजे २,०००/- रु किं चा.

२) १४,००,०००/- रु किं. एक पिवळया रंगाचा **एमएच ४२ ए ९५२३ क्रमांकाचा चारचाकी जेसीबी.**

---------------------------------

**असा एकुण ३०,५२,०००/- रु किं चा मुद्देमाल** मिळुन आला म्हणुन इसम नामे १) **स्वप्नील संजय शिवेकर** वय २८ वर्षे रा. इंदोरी ता.मावळ जि. पुणे.(जेसीबी व हायवा मालक) २) **अभिजित आनंदराव शिंदे** वय २६ वर्षे रा. संतोष भोसले यांचे भाडयाचे रुममध्ये महाळुंगे (इं) ता.खेड जि. पुणे मुळपत्ताः- मुपो नागज ता.कवटेमहांकाळ जि. सांगली (एमएच १४ ए ९५२३ क्रमांकाच्या हायवाचा मालक) ३) **राजेंद्र ईश्वरचंद्र प्रसाद** वय २८ वर्षे रा. संतोष भोसले यांचे भाडयाचे रुममध्ये महाळुंगे (इं) ता. खेड जि. पुणे मुळपत्ताः- मुथारामपुरा थाना मंहावरा जि. छावरा राज्य बिहार (एमएच ४६ एआर ४८७६ क्रमांकाच्या जेसीबीचा चालक) यांचेविरुध्द महाळुंगे (ई) पोलीस चौकी येथे **गुरनं ५४२/२०२२ भा.दं.वि.कलम ३७९,३४ सह जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४८(७) सह मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १३० (१)(३)/१७७ प्रमाणे** गुन्हा नोंद करण्यात आला असुन, त्यांना सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. पुढील तपास महाळुंगे (इं) पोलीस चौकी करीत आहे.

**वरील दोन्ही कारवाई मध्ये एकुण ४३,५२,०००/- रु. किं.चा मुद्देमाल जप्त केला आहे.**

सदरच्या दोन्ही कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, मा. अप्पर पोलीस आयुक्त, श्री. डॉ.संजय शिंदे, मा. पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे) डॉ. श्री. काकासाहेब डोळे, मा. सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. डॉ. प्रशांत अमृतकर, मा. सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे-१ पद्माकर घनवट यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ.अशोक डोंगरे, पोउपनि प्रदिपसिंग सिसोदे, पोउपनि धैर्यशिल सोळंके व पोलीस अंमलदार सपोफौ विजय कांबळे, पोहवा कल्याण महानोर, पोहवा सुनिल शिरसाट, पोहवा नितीन लोंढे, पोहवा संतोष बर्गे, मपोहवा मोहिनी थोपटे, मपोहवा सुधा टोके, पोना भगवंता मुठे, पोना सचिन गोनटे, पोना मारुती करचुंडे, पोना गणेश कारोटे, मपोना संगिता जाधव, मपोना वैष्णवी गावडे, पोशि योगेश तिडके, पोशि अतुल लोखंडे, मपोशि रेश्मा झावरे यांनी केली आहे.



